**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २४नोव्हेंबर २०२२**

**ठळक बातम्या**

1. **मराठवाडा आणि विदर्भ भागातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त भागात पुराचं पाणी वळविण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला जागतिक बँकेने अर्थसहाय्य करण्याच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच आवाहन.**
2. **जागतिक स्तरावर गोवराचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका असल्याचा जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा.**
3. **प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत महाराष्ट्र देशात अव्वल; नागपूर विभागात** 350 **अन्न प्रक्रिया प्रकल्प मंजूर.**
4. **प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये हत्तीरोग व्यवस्थापन केंद्र सुरू करणारी तसच हत्तीरोगग्रस्तांना विशेष चपलांच वितरण करणारी नागपूर महानगरपालिका ठरली पहिली महानगरपालिका.**

*****

अर्थसहाय्य - मा.सं.

मराठवाडा आणि विदर्भ भागातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त भागात पुराचं पाणी वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनानं तयार केला असून त्यासाठी जागतिक बँकेने अर्थसहाय्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं. जागतिक बँकेचे भारतातले प्रमुख ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामुले मराठवाडा आणि विदर्भातल्या सुमारे ५ हजार गावांना फायदा होत आहे. या प्रकल्पाला जागतिक बँकेचं सहाय्य लाभलं असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या यशस्वीतेनंतर दुसऱ्या टप्प्याला मान्यता देण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

पीक विमा योजना

हवामान संकट आणि तंत्रज्ञानातील वेगवान प्रगतीला प्रतिसाद म्हणून केंद्रीय कृषी मंत्रालय, प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांच्या हिताचे बदल करण्यास तयार आहे. अशा हवामान संबंधी आपत्तींचा शेतीवर थेट प्रभाव पडत असल्यामुळे, देशातील असुरक्षित शेतकरी समुदायाचे लहरी हवामानापासून संरक्षण करणे महत्वाचे आहे 2016 मध्ये प्रधानमंत्री फसल बीमा योजना सुरू झाल्यानंतर, या योजनेने पेरणीपूर्व कालावधीपासून पीक कापणीच्या कालावधीपर्यंत सर्व पिके आणि धोक्यांसाठी सर्वसमावेशक संरक्षण उपलब्ध करून दिले जे राष्ट्रीय कृषी विमा योजना आणि सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या यापूर्वीच्या योजनांमध्ये समाविष्ट नव्हते

याकडे कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव मनोज आहुजा यांनी लक्ष वेधले.

## हिवाळी अधिवेशन

राज्यविधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांची हाताळणी संवेदनशीलतेनं आणि तत्परतेनं करणार असल्याचं, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटलं आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, अजित पवार आणि अंबादास दानवे यांनी काल गोऱ्हे यांची भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न आणि स्त्रियांवरील अत्याचारांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन, सर्व विषयांवर संवेदनशीलतेनं आणि समन्वयाच्या भूमिकेतून मार्ग काढण्याच्या दृष्टीनं या बैठकीत चर्चा झाल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या १९ डिसेंबरपासून नागपूर इथं होणार आहे.

## शरद पवार

राज्यपाल ही एक संस्था असून तिच्या काही मर्यादा आणि बंधन असतात. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सगळ्या मर्यादा सोडल्या अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. त्या प्रकरणानंतर राज्यपालांनी छत्रपतींच कौतुक करणारं विधान केलं. मात्र, राज्यभरातून उमटलेल्या प्रतिक्रियांनंतर केलेलं हे विधान म्हणजे उशीराचं शहाणपण आहे, असं ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत म्हणाले. विविध विषयांवर त्यांनी यावेळी भाष्य केलं. तसेच राज्यपालांच्या या विधानाची दखल आता राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी घ्यावी. अशा व्यक्तीकडे राज्यपाल पदासारख्या जबाबदाऱ्या देणं योग्य नाही, असंही पवार म्हणाले.

## गोवर लसीकरण

कोविड-१९ काळातल्या परिस्थितीमुळे गोवर लसीकरणाकडे काहीसं दुर्लक्ष झालं असून त्यामुळं आता जागतिक स्तरावर गोवराचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण झाला असल्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेनं दिला आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि अमेरिकातील रोग नियंत्रण आणि प्रतिबंध विभागानं प्रसिद्ध केलेल्या संयुक्त अहवालात म्हटलंय की ,कोविड साथीमुळे गेल्या वर्षी सुमारे चार कोटी मुलांचा गोवर लशीचा डोस हुकला. जागतिक आरोग्य संघटनेचे गोवर विषयक तज्ज्ञ पॅट्रिक ओ'कॉनर यांनी सांगितलं की,गोवराची लागण होण्याचं प्रमाण गेल्या काही वर्षांच्या तुलनेत कमी आहे, त्यामुळे याबाबत ठोस कृती करण्याची हीच योग्य वेळ आहे. २०२१ मध्ये जगभरात गोवराचे अंदाजे ९० लाख रुग्ण आढळले, तर एक लाख २८ हजार जणांचा मृत्यू झाला . गोवराचा विषाणू हा सर्वात वेगानं संसर्ग पसरवणाऱ्या विषाणूंपैकी एक असला तरी लसीकरणाद्वारे त्याचा धोका टाळता येऊ शकतो. परंतु यासाठी ९५ टक्के लोकसंख्येचं लसीकरण आवश्यक आहे, असंही जागतिक आरोग्य संघटनेनं स्पष्ट केलं आहे.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना

स्थानिक, सेंद्रिय तसेच पारंपारिक उत्पादनांना वाव देण्यासाठी केंद्र पुरस्कृत 'आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग' ही योजना कृषी विभागामार्फत संपूर्ण राज्यभर राबविली जात आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थी घटकांतर्गत मंजूर प्रकरणांमध्ये महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. तर ऑक्टोबर अखेरीस वैयक्तिक लाभार्थी घटकांतर्गत नागपूर विभागात 350 अन्न प्रक्रिया प्रकल्प मंजूर झाले आहेत. नव्याने स्थापीत होणा-या किंवा सद्यस्थितीत कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना विस्तारीकरण, स्तर वृद्धीसाठी क्रेडिट लिंक बँक सबसिडी या योजनेतून दिली जात असून संबंधित जिल्हयाच्या एक जिल्हा एक उत्पादनावर आधारित कृषी प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य दिल जात आहे. या योजनेंतर्गत भांडवली गुंतवणूक, सामाईक पायाभूत सुविधा, इनक्युबेशन सेंटर, स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांना बीज भांडवल इत्यादी घटकांसाठी अर्थसहाय्य देण्यात येत. वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रकल्प किमतीच्या 35 टक्के, जास्तीत जास्त 10 लाख तर सामाईक पायाभूत सुविधा, इन्क्युबेशन केंद्र, मुल्यसाखळी या घटकांसाठी प्रकल्प किमतीच्या 35 टक्के, जास्तीत जास्त 3 कोटी अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

## टॉकिंग ट्री

झाडाची संपूर्ण माहिती, त्याचे उपयोग आदी बाबी जाणून घेण्यासाठी चंद्रपूर येथील वन प्रबोधनीने अभिनव उपक्रम राबवून झाडावर 'क्यूआर कोड' विकसीत केला आहे. या क्यूआर कोडचे लोर्कापण राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वन प्रबोधनीच्या परिसरात नुकतेच करण्यात आले. विशेष म्हणजे या क्यूआर कोडच्या माध्यमातून आता झाड स्वत:बद्दलची माहिती स्वत:च देणार आहे. 'टॉकिंग ट्री' म्हणजेच बोलणारे झाड असा हा उपक्रम आहे. वन प्रबोधनी परिसरात मोठ्या प्रमाणात वने आणि वनेत्तर प्रजातींची झाड असून या ॲपच्या वापरामुळे परिसरातील जैव विविधतेबद्दल अधिकाधिक माहिती जाणून घेण शक्य होणार आहे.

## निसर्ग पर्यटन केंद्र

चंद्रपूरच्यामुल तालुक्यातील उथळपेठ येथे निसर्ग पर्यटन केंद्र विकसीत करण्याचा निर्णय वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला आहे. यासंदर्भात चंद्रपूरात वनप्रबोधिनी येथे झालेल्या बैठकीत चर्चा आणि सादरीकरण करण्यात आले. चंद्रपूर वन विभागांतर्गत येणाऱ्या चिचपल्ली वन परिक्षेत्रातील उथळपेठ या गावाच्या शेजारी डोंगराळ परिसरात गायमुख हे प्रसिद्ध आणि ऐतिहासिक स्थळ आहे. येथे हेमाडपंथी आणि काळ्या दगडातील बांधकाम केलेल सुमारे 700 वर्ष जून शिवमंदिर आहे. मंदिराच्या पायथ्याशी पुरातनकालीन कुंड बांधण्यात आल आहे. त्या कुंडाला गायमुखी आकार देण्यात आला असल्यान या स्थळाला गायमुख म्हणून परिसरात ओळखण्यात येत.

संवाद कार्यक्रम

राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे स्टार्टअप, नावीन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित उद्योग तसेच लहान लहान उद्योगांना प्रोत्साहन देत असून राज्यात येत्या 2023 च्या शेवट पर्यंत राज्यातील विविध MIDC त असे अनेक उद्योग बघायला मिळतील अशी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा यांनी आज दिली. ते आज नागपूरात विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन तर्फे आयोजित उद्योजक आणि प्रशासन यांच्यातीलसंवाद कार्यक्रमात बोलत होते.

मारोतराव कन्नमवार पुण्यतिथी

महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री आणि भटक्या विमुक्त समाजाचे नेते स्वर्गीय मारोतराव कन्नमवार यांची आज 59 वी पुण्यतिथी साजरी करण्यात येत आहे. नागपुरातील विधानभवन परिसरात असलेल्या मारोतराव कन्नमवार यांचा पुतळ्याला विविध सामाजिक संघटना, विविध राजकीय पक्षातर्फे आदरांजली वाहण्यात येत आहे

हत्तीरोग निर्मुलन

हत्तीरोग हा जीवघेणा आजार नसला तरी मानवाला कायमचे अपंगत्व प्रदान करून शरीर विद्रुप करणारा आजार आहे. या आजारामुळे पायाचा आकार विक्राळरित्या वाढतो. विशाल आकाराच्या या पायांना लागणाया चपलांचा आकार मिळणे कठीण असल्यानेनागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाकृष्णन बी. यांच्यापुढाकारामुळे रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊनटाऊन यांच्या सहकार्यामुळे हत्तीरोगग्रस्तांसाठी विशेष चपला उपलब्ध करून त्यांचे वितरण करण्यात आल आहे. मनपा आयुक्तांनी स्वत: या चपला वितरीत करत बाधितांशी संवाद साधला. विशेष म्हणजे, हत्तीरोगग्रस्तांना विशेष चपलांच वितरण करणारी नागपूर महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली आहे.नागपूर महानगरपालिकेतर्फे मानेवाडा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे (Morbidity Management and Disability Prevention)/ हत्तीरोग व्यवस्थापन केंद्र-एमएमडीपी क्लिनिक सुरू करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एमएमडीपी क्लिनिक सुरू करणारीही नागपूर महानगरपालिका संपूर्ण महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका आहे. सध्या नागपुरात हत्तीरोगाचे ८३७ रुग्ण आहेत. त्यापैकी १०० अत्यंत गरजू रुग्णांना रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊनटाऊनच्या वतीने विशेष पादत्राणे देण्यात आलीआहेत. सर्वप्रथम २५ रुग्णांना ही पादत्राणे वितरीत करण्यात आले आहे.

*******